**नियमीत दिवाणी दावा क्र.४/२०२२**

**CNRNOMHOS120000292022**

**सुरेखा वि. शासन**

**<u>नि.क्र. ३८ खालील आदेश</u>**

(आदेश दि.१९/११/२०२२)

१. प्रतिवादी क्र.२२, २३, ३०, ३१, ३५ ते ४१, ४७, ४८, ५१ ते ५४ व ६४ ते ७० यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होऊन मिळण्यासाठी व त्यांची कैफियत या कामी दाखल करुन घेण्यासाठी केलेला आहे. अर्जातील कथनाप्रमाणे नेमलेल्या तारखेला त्यांना प्रकरणातील महत्वाची कागदपत्रे/माहिती न मिळाल्यामुळे तसेच काही प्रतिवादी आजारी असल्याकारणाने ते या कामी हजर होऊ शकले नाहीत. दाव्यात त्यांचे हक्क संबंध गुंतलेले आहेत. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. वादी यांनी प्रस्तुत अर्जास हरकत घेतली आहे की, प्रतिवादी हेतुपुरस्सर गैरहजर राहिले आहेत. अर्जातील कारण संयुक्तीक नाही. सबब, अर्ज नांमजूर करण्याची विनंती केली आहे व वैयकल्पीकरित्या मंजुर करावयाचा झाल्यास प्रत्येक प्रतिवादीकडून वादीस खर्चाची रक्कम १०००/- देण्याची विनंती केली आहे.

३. अर्ज व म्हणणे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणी आज रोजी देखील काही अन्य प्रतिवादींच्या बाबतीत वादीने स्टेप्स घेणेवर नेमले आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादीच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करून त्यांना कैफियत देण्याची परवानगी दिल्यास त्यांचे न भरुन येणारे नुकसान टाळता येईल. प्रस्तुत प्रतिवादींनी या कामी जो काही विलंब केला आहे त्यापोटी त्यांना अल्पशी कॉष्ट करणे योग्य राहील. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. निशाणी क्र.३८ खालील अर्ज सर्व प्रतिवादींनी मिळून एकूण र.रु.१२००/- वादीला खर्चाची रक्कम म्हणून देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२.     प्रस्तुत अर्जाचा खर्च प्रस्तुत प्रतिवादींनी सोसण्याचा आहे.

Digitally signed by
AMOGH PRABHAKAR
KULKARNI
Date: 2022.11.19
15:58:04 +0530

दिनांक – १९/११/२०२२                    (श्री. ए. पी. कुलकर्णी)

सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,

भूम.

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Devidas S. Shiral,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | A. P. Kulkarni<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom,<br>District - Osmanabad. |
| Date | --- | 19/11/2022 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 19/11/2022 |
| Order uploaded on | --- | 19/11/2022 |